




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com








* वर्ष ६५ वे * अंक १९१ * नांदेड * रविवार, दि. १९ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# सोनम वांगचूक यांना उपोषणस्थळावरून हटवले

## पोलिसांकडून जबरदस्तीने रुणालयात दाखल



**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** नीट परीक्षेतील कथित फेरफार आणि अनियमिततेच्या निषेधार्थ दिल्लीतील जंतर-मंतर इथे उपोषणाला बसलेल्या पर्यावरणशास्त्रज्ञ सोनम वांगचुक यांना आंदोलन स्थळावरुन हटवण्यात आलं आहे. सोनम वांगचुक यांच्या उपोषणाचा आजचा २१ वा दिवस होता. पोलिसांकडून त्यांना जबरदस्तीने रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे गेल्या २० दिवसांपासून उपोषणाला बसलेल्या सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी रुग्णालयात नेले आहे. 'नीट' सारख्या प्रमुख परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करत वांगचुक २८ जूनपासून उपोषणावर होते.

'कॉकरोच जनता पार्टी'चे प्रवक्ते सौरभ दास यांनी या परिस्थितीबाबत माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, दिल्ली पोलिसांनी अभिजीत दिपके यांना त्यांच्या निवासस्थानावरून ताब्यात घेतलं. ते पुढे म्हणाले, मला लोकांकडून समजलं की, सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवलं आहे आणि विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज केला आहे.

जंतर-मंतर येथे सीजेपीच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनादरम्यान, २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढण्याची घोषणा केली होती. मात्र, त्याआधीच सोनम वांगचुक यांना आंदोलनस्थळावरून हटवण्यात आलं आहे.

सोनम वांगचुक यांची खालावलेली प्रकृती यासंदर्भात दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी होणार होती. त्यापूर्वीच पोलिसांनी जंतर-मंतर इथे ही कारवाई केली. प्रत्येक नागरिकाचा जीव मौल्यवान आहे, हे लक्षात घेऊन, न्यायालयानं यापूर्वीच सोनम वांगचुक यांची दररोज वैद्यकीय तपासणी करण्याचं, तसेच त्यांच्या प्रकृतीवर नियमित देखरेख ठेवून त्यांना आवश्यक वैद्यकीय मदत पुरवण्याचे निर्देश दिले होते.

सलग २० दिवसांच्या उपोषणानंतर सोनम वांगचुक यांची प्रकृती सतत खालावत होती, वांगचुक यांनी शुक्रवारी रात्री एक व्हिडीओ मेसेज जारी केलेला. ज्यामध्ये त्यांनी आपलं सुमारे २० टक्के वजन कमी केल्याचं सांगितलं. तसेच, त्यांच्या स्नायूंवरही परिणाम झाल्याचं त्यांनी नमूद केलंय. तरीही त्यांचं मनोधैर्य आणि मानसिक स्थिती खंबीर होती.

### अभिजीत दिपकेची आमरण उपोषणाची घोषणा; २० जुलै रोजी संसदेवर मोर्चाचा निर्धार

मी आजपासून माझं उपोषण सुरू करतोय. २० जुलै रोजी आमचा मोर्चाही निघेल आणि माझे उपोषणही सुरूच राहील. सोनम सर यांना इथून उचलून नेल्यानं हे आंदोलन संपवता येईल, असं या लोकांना वाटतंय, पण हे आंदोलन संपणार नाही, असे 'कॉकरोच जनता पार्टी'चे (सीजेपी) संस्थापक अभिजीत दिपके म्हणाले.

# खा. आष्टीकरांसह सहा खासदारांच्या विलिनीकरणाला मंजुरी

**मुंबई (प्रतिनिधी)–** ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत शिंदेंच्या शिवसेनेला पाठिंबा दिलेल्या खा. नागेश पाटील आष्टीकर यांच्यासह सहा फुटीर खासदारांबाबत लोकसभा सचिवालयाने विलिनीकरणाला मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सहा खासदार आता शिंदेंच्या शिवसेनेचे अधिकृत खासदार बनले आहेत. या विलिनीकरणावर लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शिक्कामोर्तब केलं आहे. त्यामुळे या सहाही खासदारांची खासदारकी वाचली असून ते आता शिंदेंच्या शिवसेनेचे खासदार म्हणून काम करणार आहेत.

यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ज्या लोकांनी या खासदारांना निवडून दिलं आहे त्यांची कामं होणं महत्त्वाची आहेत. आमच्याकडे आलेल्या सहा खासदारांनी त्यांच्या मतदारसंघाच्या विकासासाठी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्यांना मोठा विकासनिधी दिला जाईल.

आधीच एकटा फुटीचा सामना करावा लागलेल्या ठाकरेंच्या शिवसेनेला आणखी एक मोठा धक्का बसला. गेल्या लोकसभेच्या निवडणुकीत ठाकरेंच्या शिवसेनेतून निवडून आलेल्या सहा खासदारांनी त्यांची साथ सोडत शिंदेंच्या शिवसेनेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, यवतमाळचे खासदार संजय देशमुख, परभणीचे खासदार संजय जाधव, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, मुंबई दक्षिणचे खासदार संजय दिना पाटील आणि शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरेंचा समावेश आहे.

या सहा खासदारांनी आधी आपला एक वेगळा गट स्थापन केला. त्यानंतर या गटाला लोकसभा अध्यक्षांनी मान्यता दिली. नंतर या गटाने शिंदेंच्या शिवसेनेच अधिकृतपणे विलिनीकरणाचा निर्णय घेतला आहे.

# शिक्षकाच्या आत्महत्येप्रकरणी उपशिक्षणाधिकाऱ्यांसह चौघांवर गुन्हा दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून हिमायतनगर तालुक्यातील पोटा येथील एका प्राथमिक शिक्षकाने आपल्या दोन चिमुकल्यांसह गोदावरी नदीत पुलावरून कार घालून आत्महत्या केली होती. याप्रकरणी नांदेड ग्रामीण पोलिसांनी मयताच्या वडीलांनी दिलेल्या तक्रारीवरून उपशिक्षणाधिकारी यांच्यासह चार जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

हिमायतनगरातील पोटा बु. येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सुनील नारायण मोरे हे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या मानसिक जाचामुळे गेल्या काही दिवसांपासून तनावात होते. अखेर १७ जुलै रोजी सकाळी पुणेगाव ते आमदुरा दरम्यान असलेल्या गोदावरी

नदीच्या पुलावरून सुनील मोरे यांनी आपली मुलगी सारा (वय १४) आणि मुलगा सुमीत (वय १०) या दोघांना सोबत घेऊन कार थेट नदी पात्रात घातली. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. दरम्यान आपण वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या जाचाला कंटाळून आत्महत्या करत असलेल्या मजकुर लिहून तो मोबाईलच्या स्टेटसला ठेवला होता. यामुळे नांदेड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली होती. या प्रकरणी मृत शिक्षक सुनील मोरे यांचे वडील नारायण मोरे रा. भोकर यांनी दिलेल्या तक्रारीवरून नांदेड ग्रामीण पोलिसांनी सध्या कार्यरत असलेले अमरावती येथील उपशिक्षणाधिकारी किसन फोले, विस्तार अधिकारी सूर्यकांत बाचे, केंद्रप्रमुख शिवाजी कदम व दत्ता विश्वंभर पवळे या चौघांविरूध्द मोरे यांना त्यांच्या दोन मुलांसह आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोलकर हे अधिक तपास करत आहेत. या चौघांना पोलिसांनी ताब्यात घेतले का, याची माहिती मिळू शकली नाही. मात्र पोलिसांनी संबंधितांवर कडक कारवाई करावी अशी मागणी होत आहे.




**नांदेड :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी शेतकरी विकास पॅनलच्या प्रचारासाठी हनुमान गड मंदिर येथे श्रीफळ फोडून प्रचार सुरू करण्यात आला. यावेळी माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, माजी पालकमंत्री डी.पी. सावंत, आ. आनंद बोंढारकर, आ. भीमराव केराम, आ. ॲड. श्रीजया चव्हाण, माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर, प्रणितताई देवरे-चिखलीकर, कैलास देशमुख गोरठेकर आदी दिसत आहेत.

# वाहतूक कोंडी करणाऱ्या हातगाड्यांवर धडक कारवाई; ५ हातगाडी चालकांवर गुन्हा दाखल

## जुन्या मोंढ्यात अवैध पार्किंगवर इतवारा पोलिसांची कारवाई; सार्वजनिक रस्ता अडविल्याप्रकरणी गुन्हे

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाढणारे अतिक्रमण आणि अवैध वाहन व हातगाडे पार्किंगमुळे होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन इतवारा पोलीस स्टेशनने कठोर कारवाई केली आहे. जुन्या मोंढा परिसरातील मुख्य सार्वजनिक रस्त्यावर बेकायदेशीरपणे हातगाडे उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या पाच हातगाडे चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील जुन्या मोंढा परिसरात रस्त्यावर बेकायदेशीरपणे लावलेल्या हातगाड्यांमुळे नागरिक, व्यापारी, विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णवाहिका, अग्निशमन दल आणि इतर आपत्कालीन सेवांच्या वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. या संदर्भात इतवारा पोलीस स्टेशनला अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन दि. १७ जुलै २०२६ रोजी रात्री सुमारे ९:१० वाजता जुन्या मोंढा परिसरात विशेष मोहीम राबविण्यात आली.

कारवाईदरम्यान सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करून हातगाडे उभे करणाऱ्या खालील पाच हातगाडे चालकांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

पोलिसांनी प्रकाशसिंह सालीकराम परमार रा. गाडीपुरा, नांदेड प्रितमसिंह हरसिंह ठाकूर रा. गाडीपुरा, नांदेड, दुर्गेश गोपालसिंह ठाकूर रा. गाडीपुरा, नांदेड, विशालसिंह प्रतापसिंह ठाकूर रा. गाडीपुरा, नांदेड, करणसिंह सालीकराम परमार रा. गाडीपुरा, नांदेड यांना अटक केली.

याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक रामेश्वर खनाळ व पोलीस निरीक्षक संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक प्रवीण आगलावे, पोलीस अंमलदार कदम, कोरनुळे, शेख शोयब यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# आरसीसीवर क्लासेसवर पुन्हा धडकली सीबीआय

**लातूर (प्रतिनिधी)–** नीट पेपरफुटीनंतर चर्चेत आलेल्या लातूरमधील शिवराज मोटेगावकरांच्या आरसीसी या कोचिंग सेंटरच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा घेण्यात आलेल्या नीट परीक्षेमध्ये घवघवीत यश मिळवलं. नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर काही वेळातच सीबीआयचे ८ अधिकाऱ्यांचे पथकाने लातूरमध्ये आरसीसी क्लासेसवर धाड टाकली. या कारवाईमुळे लातूरमधील शैक्षणिक वर्तुळात आणि कोचिंग क्लास चालकांमध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे.









# डॉ. निलाभ रोहन यांच्या निर्देशानुसार जिल्हाभर धडक कारवाई

## एकाच दिवशी ५६ छापे, ६७ जणांना दणका



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील अवैध व्यवसाय पूर्णतः बंद करण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या निर्देशानुसार दि. १७ जुलै रोजी जिल्हाभरात 'मास रेड'चे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेअंतर्गत एकाच दिवसात ५६ ठिकाणी छापे मारून ६७ जणांना दणका देण्यात आला आहे.

जिल्हाभरात मास रेड मोहिमेअंतर्गत अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व अवैध जुगार खेळणाऱ्या इसमांवर एकाच वेळी धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत अतिरिक्त पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, सूरज गुरव यांच्यासह सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच सर्व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी भाग घेतला.

अवैध दारू, हातभट्टी दारू निर्मिती व अवैध जुगार खेळणाऱ्या लोकांच्या ठिकाणांवर छापे टाकून त्यांचे समूळ उच्चाटन करण्याच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या मोहिमेत जिल्ह्यात एकूण ५६ गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये ६७ आरोपींवर कारवाई करत एकूण ८ लाख ७१ हजार ७९० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालात अवैध देशी- विदेशी दारू, हातभट्टी बनविण्यासाठी वापरले जाणारे रसायन, साहित्य, जुगाराचे साहित्य व रोख रक्कम यांचा समावेश आहे.

जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्यांवर अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू राहणार आहे. नागरिकांनी कोणताही अवैध धंदा निदर्शनास आल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याला माहिती द्यावी, असे आवाहन नांदेड पोलीस दलामार्फत करण्यात आले आहे.


# डोंबिवलीतील डॉक्टर हल्ल्याच्या निषेधार्थ नांदेडमध्ये 'आयएमए'चा दोन दिवसीय मोर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** डोंबिवली येथील शास्त्रीनगर महापालिका रुग्णालयात डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांवर झालेल्या हिंसक हल्ल्याच्या निषेधार्थ इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) नांदेड शाखेच्यावतीने २० आणि २१ एप्रिल (सोमवार व मंगळवार) रोजी दोन दिवसीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी निघणारा हा मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार असून, जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन दिले जाईल.

डोंबिवली हल्ल्यातील आरोपींना तात्काळ अटक करून खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवावा. देशभरातील आरोग्य सेवांच्या सुरक्षिततेसाठी कठोर 'केंद्रीय कायदा' लागू करावा. शासकीय रुग्णालयांमधील राजकीय हस्तक्षेप आणि दहशत त्वरित थांबवावी. रुग्णालयांच्या सक्षमीकरणासाठी अर्थसंकल्पात वाढ करून पायाभूत सुविधा पुरवाव्यात आदी मागण्या या मोर्चातून करण्यात येणार आहेत.

आरोग्य कर्मचाऱ्यांवरील हल्ले खपवून घेतले जाणार नाहीत. या अन्यायाविरोधात जिल्ह्यातील सर्व शासकीय व खाजगी डॉक्टर्स, परिचारिका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन आयएमएच्यावतीने करण्यात आले आहे.

या मोर्चाचे नेतृत्व डॉ. प्रल्हाद कोटकर, डॉ. राहुल लव्हेकर, डॉ. राजेश तगडपल्ले व इतर पदाधिकारी करणार आहेत.



# ज्येष्ठ समाजवादी नेते डॉ. कुमार सप्तर्षी यांचं निधन

**पुणे (प्रतिनिधी)–** ज्येष्ठ समाजवादी नेते, पुरोगामी विचारवंत, 'युवक क्रांती दला'चे (युक्रांद) संस्थापक आणि महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष डॉ. कुमार सप्तर्षी यांचे निधन झाले, ८५ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना मधुमेहाचा त्रास होता आणि अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना पुण्यातील एरंडवणे येथील खासगी रुग्णालयात नेले होते. मात्र, उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली. डॉ. कुमार सप्तर्षी हे महाराष्ट्रातील एक प्रमुख पुरोगामी विचारवंत होते. लोकशाही मूल्यांचा आग्रह धरत असतानाच सामाजिक न्यायाच्या लढ्यात ते कायम अग्रेसर असत. विधिमंडळ सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले आहे.







## बँक राष्ट्रीयीकरण : आर्थिक समतेकडे टाकलेले ऐतिहासिक पाऊल

जेव्हा अर्थव्यवस्था जनतेच्या हितासाठी कार्य करते, तेव्हाच खरी आर्थिक लोकशाही घडते. १९ जुलै १९६९ रोजी झालेले बँकांचे राष्ट्रीयीकरण हे भारताच्या आर्थिक इतिहासातील असेच एक परिवर्तनकारी पाऊल ठरले, ज्याने बँकिंग सेवा, कर्जसुविधा आणि विकासाच्या संधी समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचविण्याचा मार्ग खुला केला.

१९ जुलै १९६९ हा दिवस भारतीय बँकिंग आणि आर्थिक इतिहासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जातो. या दिवशी भारत सरकारने देशातील १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करून बँकिंग व्यवस्थेला लोककल्याणाची नवी दिशा दिली. हा निर्णय केवळ बँकांच्या मालकीतील बदल नव्हता, तर आर्थिक संसाधनांचा लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याचा व्यापक सामाजिक आणि आर्थिक उपक्रम होता.

राष्ट्रीयीकरणापूर्वी बँकिंग सेवा प्रामुख्याने शहरी भाग आणि मोठ्या उद्योग-व्यवसायांपुरत्याच मर्यादित होत्या. ग्रामीण भाग, शेतकरी, लघुउद्योजक, कारागीर आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना औपचारिक बँकिंग सेवा व कर्जसुविधा सहज उपलब्ध होत नव्हत्या. परिणामी, अनेकांना खासगी सावकारांवर अवलंबून राहावे लागे, ज्यामुळे आर्थिक विषमता अधिक वाढत होती.

या पार्श्वभूमीवर राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे बँकांना नफा-केंद्रित दृष्टिकोनाबरोबरच सामाजिक जबाबदारीही स्वीकारावी लागली. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर नवीन शाखा सुरू झाल्या, शेतकरी आणि लघुउद्योजकांसाठी कर्जपुरवठा वाढला, तसेच प्राधान्य क्षेत्रांना वित्तपुरवठा करण्यास विशेष महत्त्व देण्यात आले. त्यामुळे आर्थिक विकासाचा प्रवाह शहरांपासून गावांकडे वळू लागला.

बँक राष्ट्रीयीकरणामुळे देशात बचतीची सवय वाढली, सर्वसामान्य नागरिकांचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास दृढ झाला आणि आर्थिक समावेशनाला गती मिळाली. पुढील काळात स्वयंरोजगार, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक कल्याणाच्या विविध योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठीही राष्ट्रीयीकृत बँकांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आजही १९ जुलै १९६९ चा हा ऐतिहासिक निर्णय आर्थिक लोकशाही, सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून स्मरणात आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया अधिक व्यापक, समताधिष्ठित आणि लोकाभिमुख करण्यामध्ये या निर्णयाचे योगदान अत्यंत मोलाचे मानले जाते.

बँक राष्ट्रीयीकरणापूर्वी भारतातील बहुतांश बँक शाखा मोठ्या शहरांमध्ये आणि व्यापारी केंद्रांमध्ये केंद्रित होत्या. ग्रामीण आणि दुर्गम भागातील नागरिकांना बँकिंग सेवांचा लाभ घेण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. शेतकरी, मजूर, कारागीर आणि लघुउद्योजक यांना संस्थात्मक कर्ज सहज उपलब्ध नसल्यामुळे त्यांना खासगी सावकारांवर अवलंबून राहावे लागे. परिणामी, ग्रामीण अर्थव्यवस्था आर्थिकदृष्ट्या मागे पडत होती.

१९ जुलै १९६९ रोजी झालेल्या बँक राष्ट्रीयीकरणानंतर ही परिस्थिती बदलू लागली. सरकारने ग्रामीण आणि अविकसित भागात मोठ्या प्रमाणावर नवीन बँक शाखा सुरू करण्यावर भर दिला. गावागावांत बँकिंग सेवा पोहोचल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना बचत खाते, ठेवी, कर्ज, विमा आणि इतर वित्तीय सेवा आपल्या परिसरातच उपलब्ध होऊ लागल्या.

ग्रामीण शाखांच्या विस्तारामुळे शेतकऱ्यांना पीककर्ज, सिंचन, कृषी यांत्रिकीकरण आणि शेतीपूरक व्यवसायांसाठी संस्थात्मक कर्ज मिळू लागले. तसेच लघुउद्योजक, स्वयंरोजगार करणारे युवक, महिला बचत गट आणि ग्रामीण उद्योगांनाही आर्थिक मदत मिळाल्याने स्थानिक रोजगारनिर्मितीला चालना मिळाली.

ग्रामीण भागात बँकिंगचा विस्तार हा केवळ शाखांची संख्या वाढण्यापुरता मर्यादित नव्हता; तर त्याने आर्थिक समावेशन, बचतीची सवय, आर्थिक साक्षरता आणि ग्रामीण विकासाला नवी गती दिली. त्यामुळे ग्रामीण भारत मुख्य प्रवाहातील अर्थव्यवस्थेशी अधिक प्रभावीपणे जोडला गेला आणि सर्वसमावेशक विकासाच्या उद्दिष्टाला बळकटी मिळाली.

बँक राष्ट्रीयीकरणापूर्वी शेतकरी, लघु-उद्योजक, कारागीर आणि लहान व्यावसायिकांना बँकांकडून कर्ज मिळणे अत्यंत कठीण होते. बँकांचा कल प्रामुख्याने मोठ्या उद्योगसमूहांना वित्तपुरवठा करण्याकडे असल्याने ग्रामीण आणि असंघटित क्षेत्रातील अनेकांना खासगी सावकारांकडून जास्त व्याजदराने कर्ज घ्यावे लागे. यामुळे आर्थिक प्रगतीला मर्यादा येत आणि कर्जबाजारीपणाची समस्या वाढत असे.

१९ जुलै १९६९ रोजी झालेल्या बँक राष्ट्रीयीकरणानंतर या परिस्थितीत महत्त्वपूर्ण बदल घडून आला. सरकारने शेती, लघुउद्योग, स्वयंरोजगार आणि सूक्ष्म व्यवसायांना प्राधान्य क्षेत्र म्हणून मान्यता देत बँकांना या क्षेत्रांसाठी अधिक कर्जपुरवठा करण्याचे धोरण स्वीकारले. परिणामी, शेतकऱ्यांना पीककर्ज, सिंचन, कृषी यंत्रसामग्री, पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि इतर कृषीपूरक उपक्रमांसाठी सुलभ कर्ज उपलब्ध होऊ लागले.

त्याचप्रमाणे लघुउद्योजक, कारागीर, महिला उद्योजक, स्वयंरोजगार करणारे युवक आणि छोट्या व्यावसायिकांना उद्योग सुरू करण्यासाठी किंवा विस्तारण्यासाठी आवश्यक भांडवल संस्थात्मक पद्धतीने मिळू लागले. यामुळे रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ आणि ग्रामीण तसेच स्थानिक अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळाली.



बँक राष्ट्रीयीकरणामुळे कर्जपुरवठा हा केवळ आर्थिक व्यवहार न राहता सामाजिक आणि विकासाभिमुख साधन बनला. शेतकरी आणि लघुउद्योजकांना आर्थिक बळ देऊन स्वावलंबन, उद्योजकता आणि सर्वसमावेशक विकासाचा पाया अधिक मजबूत करण्यात या निर्णयाने मोलाची भूमिका बजावली.

बँक राष्ट्रीयीकरणाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे आर्थिक समावेशनाला मिळालेली गती. यापूर्वी बँकिंग सेवा प्रामुख्याने शहरी, सुशिक्षित आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम वर्गापुरत्याच मर्यादित होत्या. समाजातील दुर्बल, वंचित, अनुसूचित जाती-जमाती, महिला, अल्पभूधारक शेतकरी आणि कमी उत्पन्न गटांना औपचारिक बँकिंग व्यवस्थेचा लाभ मिळणे कठीण होते. राष्ट्रीयीकरणानंतर बँकिंग सेवा समाजातील सर्व घटकांसाठी खुल्या झाल्या. बचत खाते, कर्ज, ठेवी आणि इतर वित्तीय सेवांमध्ये सर्वसामान्यांचा सहभाग वाढला. यामुळे आर्थिक संधी अधिक न्याय्य पद्धतीने उपलब्ध होऊ लागल्या आणि आर्थिक लोकशाहीची पायाभरणी झाली.

राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या कर्जधोरणात महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. शेती, लघु-उद्योग, सूक्ष्म उद्योग, शिक्षण, गृहनिर्माण आणि स्वयंरोजगार यांसारख्या प्राधान्य क्षेत्रांना अधिक कर्जपुरवठा करण्यावर भर देण्यात आला. यामुळे उत्पादनवाढ, रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास वेगाने होऊ लागला. बँकिंग व्यवस्था केवळ नफ्यापुरती मर्यादित न राहता देशाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचे प्रभावी साधन बनली.

बँक राष्ट्रीयीकरणानंतर सर्वसामान्य नागरिकांचा बँकिंग व्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ झाला. गावागावांत शाखा सुरू झाल्यामुळे लोकांनी आपली बचत सुरक्षितपणे बँकांमध्ये ठेवण्यास सुरुवात केली. त्यामुळे बचतीची सवय वाढली, ठेवींमध्ये लक्षणीय वाढ झाली आणि देशांतर्गत भांडवल निर्मितीला चालना मिळाली. हीच बचत पुढे उद्योग, शेती आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी उपयोगी पडली.

राष्ट्रीयीकरणामुळे बँकिंग सेवांचा लाभ काही मोजक्या उद्योगसमूहांपुरता मर्यादित राहिला नाही. समाजातील विविध आर्थिक आणि सामाजिक घटकांना समान संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न झाला. दुर्बल घटक, महिला, ग्रामीण नागरिक, लघुउद्योजक आणि वंचित समाजघटकांना कर्ज व वित्तीय सेवा मिळाल्याने सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला बळकटी मिळाली. आर्थिक संसाधनांचे अधिक समतोल वितरण हे राष्ट्रीयीकरणाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य ठरले.

### गावापासून देशाच्या प्रगतीपर्यंत

राष्ट्रीयीकरणानंतर मागास, आदिवासी आणि दुर्गम भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर नवीन बँक शाखा सुरू करण्यात आल्या. त्यामुळे आर्थिक विकास काही शहरांपुरता मर्यादित न राहता देशाच्या सर्व भागांपर्यंत पोहोचू लागला. स्थानिक उद्योग, शेती, व्यापार आणि रोजगाराला चालना मिळाल्याने प्रादेशिक विषमता कमी करण्यास मदत झाली आणि संतुलित विकासाचा पाया मजबूत झाला.

बँक राष्ट्रीयीकरण हा भारतीय राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. या निर्णयामुळे बँकिंग व्यवस्था देशाच्या आर्थिक नियोजन, सामाजिक कल्याण आणि सर्वसमावेशक विकासाशी अधिक प्रभावीपणे जोडली गेली. ग्रामीण विकास, गरिबी निर्मूलन, रोजगारनिर्मिती आणि विविध कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत राष्ट्रीयीकृत बँकांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे बँका केवळ आर्थिक संस्था न राहता राष्ट्राच्या विकासाच्या प्रवासातील विश्वासार्ह भागीदार बनल्या.

बँक राष्ट्रीयीकरण हा केवळ बँकांच्या मालकीतील बदल नव्हता, तर आर्थिक संधी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवून समताधिष्ठित आणि लोकाभिमुख अर्थव्यवस्थेची पायाभरणी करणारा ऐतिहासिक निर्णय होता.

**-डॉ. शिवराज कदम**
नांदेड
मो. ९७६७८३०४९८

## संघर्षशील नेतृत्त्व: श्रावण पाटील भिलवंडे

जब हौसला बना लिया
ऊंची उड़ान का,
फिर देखना..
फिजूल है
कद आसमान का

यातील शब्द न् शब्द आपल्या प्रभावी कर्तृत्वातून अगदी सार्थ ठरवत अविचल पक्षनिष्ठा, अफाट जनसंपर्क, अद्वितीय कार्यपद्धती, अविरत परिश्रम, अपार लोकसामर्थ्य अन् अलौकिक सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय सत्कार्य याद्वारे गेली तब्बल ३५ वर्षे भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून समर्पित सेवाकार्य करत सबंध नांदेड जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळातील मातब्बरांच्या मांदियाळीत स्वकर्तृत्वाने अथांग लोकप्रियतेचे अढळ वलय निर्माण करणारे लोककल्याणकारी युवा नेतृत्व म्हणून नायगाव पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे नरसीकर यांचे नांव प्राधान्याने घ्यावे लागेल. ग्रामीण राजकारणात प्रस्थापितांशी दोन हात करत राजकीय संघर्षाच्या लढाईत वाड्या-वस्तीवर भाजपचा लढवय्या कार्यकर्ता निर्माण करणारे माजी सभापती श्रावण पाटील भिलवंडे यांचा आजवरचा जीवन प्रवास प्रचंड संघर्षाने भारलेला अन् तितकाच असंख्य जनसामान्यांच्या आपुलकीमय जिव्हाळ्याने भरलेला राहिला आहे.

अगदी शालेय जीवनापासून राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून श्रावण भिलवंडे यांनी आपल्या सामाजिक कार्याला सुरुवात केली. या कार्याला व्यापक व प्रतिभाशाली व्यासपीठ मिळवून दिले ते भारतीय जनता पक्षाने. महाविद्यालयीन काळातच श्रावण भिलवंडे यांनी भाजपचा झेंडा खांद्यावर घेतला. ऊन, वारा, पाऊस याची कसलीच पर्वा न करता पक्ष नेतृत्वाचा प्रत्येक आदेश शिरसावंद्य मानत खऱ्या अर्थाने लोकांसाठी व्यवस्थेशी दोन हात करणारा जिगरबाज युवा नेता श्रावण भिलवंडेंच्या रूपाने उदयास आला. ज्याकाळी पक्षाचा झेंडा हाती घेण्यास कोणी पुढे येत नव्हते त्याकाळी भिलवंडे यांनी गावोगाव फिरून कार्यकर्ते उभे केले. पाठबळ दिले. संकटातील कार्यकर्त्यांच्या एका हाकेला अर्ध्यारात्री धावून जाणारा नेता ही ओळख मिळविणाऱ्या श्रावण भिलवंडे यांनी नरसी, नायगांव भागात तत्कालीन सत्तेतील प्रस्थापित पुढाऱ्यांच्या विरोधात उपेक्षित, शोषित घटकांच्या साथीने उभारलेली राजकीय परिवर्तनाची संघर्षमय नांदी जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली.



भाजपाची विचारधारा खेडोपाडी रुजविताना अनेक कडवट कार्यकर्त्यांची मजबूत फळी उभी करण्यात श्रावण भिलवंडे यशस्वी ठरले. यातून सर्व घटकातील जनतेशी आपुलकीच्या संवादातून आत्मीय जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. निरपेक्ष जनभावनेच्या याच पाठबळावर भिलवंडे यांनी पहिल्यांदाच नरसी गणातून पंचायत समितीची निवडणूक लढवली अन् प्रचंड लोकसामर्थ्याने जिंकलीसुद्धा.तालुक्यातील दिग्गज राजकारण्यांना चेकमेट देत भाजपने नायगांव पंचायत समितीवर सत्ता स्थापित केली. या लक्षवेधी राजकीय वर्चस्वाचे खरेखूरे किंगमेकर होते श्रावण भिलवंडे.पक्षनेतृत्वाने हेच राजकीय चातुर्य व संघटन कौशल्य बघता भाजपच्या भविष्यातील दमदार वाटचालीवर लक्ष केंद्रित करत श्रावण भिलवंडे यांना नायगाव पंचायत समितीच्या उपसभापतीपदी विराजमान केले. त्यामुळे तळागाळातील भाजपा कार्यकर्त्यांना तालुका पातळीवर हक्काचे प्रशासकीय कार्यालय उपलब्ध झाले. इथूनच श्रावण भिलवंडे यांची राजकीय कारकीर्द अधिक वेगाने बहरण्यास प्रारंभ झाला.

शतप्रतिशत भाजपा हा ध्यास घेवून प्रचंड जिद्दीने सुरु असलेल्या राजकीय प्रवासात श्रावण भिलवंडे यांनी अक्षरशः घरावर तुळशीपत्र ठेवून अहोरात्र पक्षविस्तार व कार्यकर्ता यावर निष्ठापूर्वक भर दिला. आक्रमक शैली, राजकीय परिपक्वता, नेतृत्व गुण यामुळे भिलवंडे यांची सबंध नांदेड जिल्हा भाजपात सर्वसमावेशक व आश्वासक तरुण नेतृत्वाची प्रतिमा निर्माण झाली. त्यातून पुढे भारतीय जनता युवा मोर्चाची जिल्हास्तरीय जबाबदारी भिलवंडे यांच्याकडे देण्यात आली.तिथेही आपल्या कार्याची यशस्वी छाप सोडत श्रावण भिलवंडे यांनी जिल्ह्यात भाजयुमोचा सर्वदूर विस्तार करत युवकांना पक्षाच्या प्रवाहात सक्रिय करण्याचे काम प्रामाणिकपणे पार पाडले. याची नोंद घेत पक्षनेतृत्वाने भाजपा जिल्हा महामंत्री पदावर भिलवंडे यांना अनेक वेळा संधी दिली. या संधीचे सोने करत त्यांनी विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक उपक्रमाच्या माध्यमातून आपले कर्तृत्व सिद्ध केले. जिल्हा व राज्य पातळीवरील अनेक नेत्यांनी या कर्तृत्वाला भरभरून पाठबळ दिले.

तीनही तालुक्यात घेतलेल्या परिश्रमाचा जबरदस्त फायदा नांदेड लोकसभेच्या निवडणुकीत ठळकपणे दिसून आला. भाजपच्या तत्कालीन उमेदवारांना विरोधी उमेदवारापेक्षा नायगांव विधानसभा मतदारसंघातून मिळालेले मताधिक्य लक्षणीय होते. त्यातून भाजपा कार्यकर्त्यांच्या उल्लेखनीय योगदानाचे कौतुक राज्यपातळीवर देखील झाले. पक्षनेतृत्वाने याकामी भिलवंडे व टीमची पाठ थोपटून केलेले कौतुक सर्वांनी पाहिले आहे.निवडणूक असो की, नसो सदैव भाजपच्या हिताचे राजकारण करताना समाजातील प्रत्येक घटकाला नरसी चौरस्त्यावर दिवसरात्र उपलब्ध असणारा डॅशिंग युवा नेता अशी लोकाभिमुख प्रतिमा तयार झालेले श्रावण भिलवंडे खरे हकदार असतांना देखील विधानसभेच्या उमेदवारीने त्यांना आजपर्यंत तरी हुलकावणी दिली. प्रखर निष्ठेने सुरु असलेल्या पक्षकार्यात त्यांनी कुठलीही तडजोड न करता भारतीय जनता पार्टीचे दायित्व चालूच ठेवले आहे. त्यांच्या या अविचल ध्येय्याचे विरोधक देखील कौतुक करतात हेही नसे थोडके.

जीवलग कार्यकर्त्यांचा भरघोस गोतावळा व पक्षाच्या विविध उपक्रमाना लोकसाथीने यशस्वी करून दाखवण्याची ऊर्जादायी धमक यामुळे दिवंगत प्रमोद महाजन, गोपीनाथराव मुंडे, भाऊसाहेब फुंडकर, शरदभाऊ कुलकर्णी, संभाजीराव पवार यांच्यापासून ते आत्ताचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री अतुल सावे, संघटनमंत्री संजय कौडगे यांच्यापर्यंत सर्वांनीच व्यक्तिशः श्रावण भिलवंडे यांच्या भाजपमधील निःस्पृह, निरपेक्ष व निस्वार्थ सेवाकार्याला दिलेले पाठबळ व त्यांच्या पाठीशी उभे केलेले पक्षसामर्थ्य देखील भल्याभल्या राजकारण्यांच्या नशिबात लाभले नाही अशीही सकारात्मक चर्चा भाजपा निष्ठावंतांच्या वर्तुळात अनेकदा ऐकावयास मिळत असते. ही देखील श्रावण भिलवंडे यांच्या परिश्रमी वृत्तीची फलनिष्पत्ती मानली जाते. यथायोग्य कर्तृत्व असल्यानेच आजपर्यंत अनेक वेळा भाजपा नांदेड जिल्हाध्यक्ष पदासाठी त्यांच्या नावाची जोरदार चर्चा झाली आहे. ते पद मिळाले नाही ही बाब अलहिदा मानली तरीही त्या पदावर श्रावण भिलवंडे यांची आजतागायत निवड होऊ शकली नाही याची खंत वाटणाऱ्या असंख्य प्रतिक्रिया भिलवंडे यांना पुन्हा जोमाने काम करण्यासाठी प्रेरित करत असतात याचा अनुभव यची देही यची डोळा गेली अनेक वर्ष पक्षनेत्यांनी घेतला आहे.

माजी मुख्यमंत्री तथा लोकनेते, भाजपचे राज्यसभेचे खा. अशोकराव चव्हाण यांनी काही महिन्यापूर्वी नरसीत नंदनंदन निवासस्थानी येवून मी श्रावण भिलवंडे यांच्या पाठीशी आहे या शब्दात व्यक्त होताना भिलवंडे यांच्या पाठीवर दिलेली आपुलकीची थाप या भागातील असंख्य निष्ठावंत भाजपा कार्यकर्त्यांना नवसंजीवनी देणारी ठरल्याचे आजही बोलल्या जाते. याच प्रेरणेतून येत्या काळात सुद्धा त्याच जिद्दीने, ध्येय्याने नरसी, नायगावसह सबंध मतदारसंघात भाजपचा विजयी झेंडा डोलाने फडकवत ठेवण्यासाठी जनसेवेचा तुफानी कारवा अविरतपणे सुरूच ठेवण्याचा श्रावण भिलवंडे यांचा दृढनिश्चय एक ऊर्जादायी उमेद असणार आहे. जबरदस्त इच्छाशक्ती...प्रबळ जनसमर्थन...कृतिशील कार्यक्षमता...माणसं जोडण्याचा व जुडलेली माणसं जपण्याचा स्वभावगुण..कर्तव्यप्रिय नेतृत्व अन् कर्तव्यनिष्ठ सवंगड्याची तेजतर्रार फळी असे प्रतिभासंपन्न गुणवैशिष्ट्य असलेल्या व्यक्तिमत्वाचा राजकीय, सामाजिक प्रवास उगवत्या सूर्याच्या सोबतीने भविष्यकाळात उत्तुंग यशोशिखरावर जाणार हे सांगायला कुणा भविष्यवेत्याची गरज नाही. पुढील चार ओळीच श्रावण भिलवंडे यांच्या दमदार व देदीप्यमान वाटचालीचा प्रत्यय देत राहतील.

वाकिफ कहाँ जमाना, हमारी उडान से..
..वो और थे, जो हार गये आसमान से!

**गोविंद टोकलवाड नरसीकर**
नरसी, ता. नायगाव, जि. नांदेड

## भारताचा आईन्स्टाईन : डॉ. जयंत नारळीकर



१९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे जन्मलेल्या जयंत नारळीकर यांना घरातूनच विद्वत्तेचा वारसा लाभला होता. वडील विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रख्यात गणितज्ज्ञ होते तर आई सुमती ह्या (माहेरचे नाव कृष्णा शंकर हुजूरबाजार) संस्कृतच्या स्कॉलर होत्या. बनारस हिंदू विद्यापीठातून १९५७ साली बी.एस्सी. पदवी घेतल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. १९५९ साली केंब्रिज विद्यापीठाची 'ट्रायपास' ही गणितातील अवघड परीक्षा वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी पास होऊन वडिलांप्रमाणे ते रैंगलर झाले. यानंतर त्यांनी जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. फ्रेड हॉएल यांच्या मार्गदर्शनाखाली विश्व उत्पत्ती संबंधी संशोधन करून सिद्धांत मांडला (१९६३). 'अंतर्गत स्फोट होऊन सूर्यापासून पृथ्वी आणि इतर ग्रह निर्माण झाले' हा त्यांच्या सिद्धांताचा मुख्य आशय. त्यानंतर १९७२ पर्यंत तेथे 'इंस्टीट्यूट ऑफ एसट्रोनॉमी' (Institute of stronomy) मध्ये संशोधनकार्य केले. आपल्या संशोधनाचा आपल्या देशाला उपयोग व्हावा म्हणून ते १९७२ मध्ये भारतात परतले व मुंबईच्या 'टाटा इंस्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या जगप्रसिद्ध संस्थेत दाखल झाले. तेथे ते अनेक मानाची व जबाबदारीची पदे भूषवित १९८९ पर्यंत कार्यरत राहिले. याचवेळी त्यांनी पुणे विद्यापीठात 'आयुंका' (इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर एसट्रोनोमी) या खगोलशास्त्रातील प्रगत अध्ययन केंद्राची अथक परिश्रमातून उभारणी केली. खगोलशास्त्र व खगोलभौतिकी या विषयांचेही संस्था मार्गदर्शन करते. अंतराळातील ग्रह, तारे, नक्षत्रे यांची माहिती देण्यासाठी डॉ. नारळीकरांनी आकाशदर्शनाचे कार्यक्रम घडवून आणले. खगोलशास्त्रातील अनेक अद्ययावत उपकरणांनी सुसज्ज अशी प्रयोगशाळा तसेच अनेक दुर्मिळ ग्रंथ व अद्ययावत नियतकालिके येथे उपलब्ध आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार व्हावा म्हणून व्याख्यानमाला, कार्यशाळा, विद्यार्थ्यांची सुट्टीतील शिबिरे आदी उपक्रम आयुका राबविते.

१९६६ मध्ये मंगला सदाशिव राजवाडे या विदुषीने डॉ. नारळीकरांच्या आयुष्यात प्रवेश केला. मंगला ह्या मुंबई विद्यापीठाच्या गणित विषयातील पीएच. डी. प्राप्त केलेल्या बुद्धिमान युवती होत्या. गणित व संशोधन हे दोघांच्याही स्वारस्याचे विषय झाल्याने आयुष्याचे गणित अत्यंत सोपे झाले. दोघांचा संसार बहरला आणि त्या संसारवेलीवर गीता, गिरिजा आणि लीलावती ही तीन कन्यारत्ने उमलली. संसार बहरत असतानाच डॉ. नारळीकरांचे संशोधन कार्यही विस्तारत गेले.

**गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत :** डॉ. नारळीकरांचे जगभर गाजलेले संशोधन म्हणजे त्यांनी डॉ. हॉएल समवेत मांडलेला गुरुत्वाकर्षण सिद्धांत होय. वेग हा सापेक्ष आहे, याची जाणीव आईन्स्टाईनच्याही पूर्वी गेलिलिओ, न्यूटन, माख यांना होती. वेगाला अर्थ देणाऱ्या विशिष्ट पार्श्वभूमीवर न्यूटन, माख यांनी मते मांडली आहेत. न्यूटनच्या मते, ही पार्श्वभूमी म्हणजे निरपेक्ष अवकाश. मात्र तो याचे अस्तित्व सिद्ध करू शकला नाही. त्यामुळे निरपेक्ष अवकाशाची कल्पना खरी की खोटी यावर शास्त्रज्ञांमध्ये मतभेद होत राहिले. यावर ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ माख याने उत्तर शोधले. बँले नर्तिकेच्या उदाहरणाद्वारे विश्वात निरपेक्ष अवकाश असे काही नसते व ग्रहताऱ्यांचे वस्तुमानच गतिनिश्चितीस पार्श्वभूमी पुरवीत असल्याचा सिद्धांत माखने मांडला. मात्र माखला हे गणितीय पद्धतीने सिद्ध करता आले नाही. माखच्या सिद्धांताचे गणितीय विश्लेषण डॉ. नारळीकरांनी आपले गुरु डॉ. हॉएल यांच्या मार्गदर्शनाखाली केले. 'जर विश्वात एकच कण असेल तर त्याला वस्तुमान असणार नाही. पण आणखी एक दुसरा कण निर्माण झाला तर दोन्ही कण एकमेकांना वस्तुमान पुरवतील' हा त्यांनी यासंदर्भात मांडलेला सिद्धांत. या सिद्धांताच्या आधारे विश्वातील प्रत्येक वस्तूची निर्मिती व अंत सांगता येतो. त्यामुळे आईन्स्टाईनच्या सापेक्षतावादाच्या समीकरणांपेक्षा डॉ. नारळीकरांची समीकरणे प्रभावी ठरतात. या सिद्धांताचे गणितीय सूत्र इतके किचकट आहे की, १९६४ साली जेव्हा रॉयल सोसायटीच्या सभागृहात उपस्थित शास्त्रज्ञांसमोर मांडले तेव्हा फारच थोड्या जणांना त्याचे आकलन झाले. वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी हा ज्ञानाच्या क्षेत्रातील महान पराक्रम केल्याने डॉ. नारळीकरांची गणना जगातील थोर खगोलशास्त्रज्ञांमध्ये केली जाऊ लागली.

**स्थिरवत विश्वस्थितीचा सिद्धांत : (Quasi Steady State Theory)** विश्व हे एका मोठ्या स्फोटाने निर्माण झाले, असे अनेक शास्त्रज्ञांचे मत आहे. १९४८ साली बॉन्डी, गोल्ड व हॉएल यांनी स्थिर विश्वस्थितीचा सिद्धांत मांडला. तो असा, विश्व हे अनादी व अनंत आहे. अपरिवर्तनशील आहे. मोठ्या कालावधीचा विचार केला तर विश्व हे स्थिर असते. पण लहान कालावधीचा विचार करता त्याच्या घटकात बदल होत असतो. त्यानंतर डॉ. नारळीकर, हॉएल व बर्बीज यांनी नवा स्थिरवत विश्वस्थिती सिद्धांत मांडला. त्यानुसार मोठ्या कालावधीचा विचार केला तर विश्व हे सतत प्रसरण पावत असते. पण लहान कालावधीचा विचार करता विश्व हे सतत आकुंचन-प्रसरण पावत असते. डॉ. नारळीकरांच्या या सिद्धांताने महास्फोट सिद्धांताला मोठे आव्हान दिले आहे.

**विज्ञानविषयक साहित्य निर्मिती :** आयुका संस्थेमार्फत चालणाऱ्या अनेक प्रयोगांना डॉ. नारळीकर मार्गदर्शन करतात. 'अवकाशातील धुमकेतूच्या शेपटीमधून अनेक रोगजंतू पृथ्वीवर येतात' या हॉएल-विक्रमसिंह सिद्धांताला पुष्टी देणारा प्रयोग आयुकातर्फे केला गेला आहे. वैज्ञानिक सिद्धांतावर आधारित कथा लिहून त्यांनी विज्ञानाविषयी सर्वसामान्य माणसांमध्ये आवड निर्माण केली. 'आकाशाशी जडले नाते' ही ग्रंथरचना त्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण भाषेत केली आहे. डॉ. नारळीकर हे अंधश्रद्धा निर्मूलनाचे खंदे पुरस्कर्ते आहेत. फलज्योतिष, पुराणकथांतील विज्ञानाच्या भाकडकथा आदी अंधश्रद्धा पसरविणाऱ्या गोष्टींवर त्यांनी आपल्या लिखाणातून टीका केली आहे. लेखन व व्याख्यान याद्वारे ते समाजाचे प्रबोधन करत असतात. विद्यापीठातून ज्योतिषशास्त्राचा अभ्यास सुरु करण्यास त्यांनी विरोध दर्शविला. त्यामुळे अंधश्रद्धेला उत्तेजन मिळेल असे त्यांचे मत होते.

केंब्रिजमध्ये शिकत असतानाच टायसन पदक, स्मिथ पारितोषिक, एडम्स पारितोषिक डॉ. नारळीकरांनी मिळविले. त्यांचा देश-विदेशात अनेक सन्मानांनी गौरव केला आहे. शांतीस्वरूप भटनागर पुरस्कार, बी. एम. बिर्ला पुरस्कार, फाय फौंडेशनचा राष्ट्रभूषण पुरस्कार, कोल्हापूरचा राजर्षी शाहू पुरस्कार, चतुरंग प्रतिष्ठानचा जीवनगौरव पुरस्कार आदी असंख्य पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. याशिवाय भारत सरकारने त्यांना पद्मभूषण (१९६५), पद्मविभूषण (२००४), पुरस्काराने तर राष्ट्रीय विज्ञान संस्थेने इंदिरा गांधी पुरस्काराने (१९९०) सन्मानित केले आहे. १९९६ मध्ये त्यांना युनोस्कोचा 'कलिंग पुरस्कार' तर २००४ मध्ये फ्रेंच सरकारचा खगोलशास्त्रातील जागतिक कीर्तीचा 'प्रिक्स जोन्सन' हा पुरस्कार प्रदान केला आहे. नुकतेच त्यांच्या सुविद्य पत्नी प्रख्यात गणितज्ज्ञ डॉ. मंगला नारळीकर यांचे निधन झाल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो. त्यांना दीर्घायुष्य लाभो, हीच शुभेच्छा !

**-प्रा. विजय कोष्टी**
सहयोगी प्राध्यापक, सांख्यिकी विभाग
पी. व्ही. पी. महाविद्यालय,
कवठेमहांकाळ, जि. सांगली

## वारी

भक्तीचा सागर उसळला
निसर्गही गहिवरला
आनंदाने सरी कोसळू लागल्या...
आकाशी सजले सुंदर रंग
सर्वत्र नांदतो पांडुरंग
वनराई हिरवाईने नटली
इंद्रधनुष्याची कमान स्वागता सजली...
विठ्ठल दर्शनी निघाली सारी
पुढे चालली आषाढी वारी
टाळ मृदंगाचा गजर करी
भक्तीत रंगला वारकरी...
संतांची पाखली भारी
अभंग गात जारी सारी
भारुडाची मजा न्यारी
करमणुकीतून प्रबोधन करी...
सोहळा तो सुखकारी
रिंगण ते मनोहरी
जयजय श्रीकृष्ण हरी
गर्जवी वारकरी...
नाही कोणी लहान-मोठा
भक्तीला नसे इथे तोटा
दुजाभाव इथे नसे, माऊली सर्वत्र असे...
लागली ओढ पंढरपुरी
चित्त धावे चंद्रभागातीरी
मुखी तुझे नाम हरी
तुझाच जयजयकार करी...
तहानभूक हरपून जाई, पुढे पुढे चालत जाई
ध्यानीमनी फक्त विठाई, दुसरे काही सुचेना बाई...
नाही काही दुसरे मनी, मन लागे विठ्ठल चरणी
पाहीन देखणे विठ्ठल रूप, होई देह विठ्ठल स्वरूप.

**-डॉ. सौ. अनुपमा प्रशांत कोटलवार**
-संवेदन, हनुमान मंदिराच्या पाठीमागे
शिवाजीनगर, नांदेड


वाढदिवस अभिष्टचिंतन
मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर...
शुभेच्छा...
माया नायगांव 9970145051
शुभेच्छूक
गजानन पाटील भिलवंडे
(प्रशासकिय चेअरमन, से.स.सो.नरसी ) (माजी सरपंच, नरसी)


वाढदिवस अभिष्टचिंतन
मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर...
शुभेच्छा...
माया नायगांव 9970145051
शुभेच्छूक
कैलास भिमराव पांचाळ
अध्यक्ष, सराफा असोशिएशन, नरसी ता.नायगांव


मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर...
शुभेच्छा...
माया नायगांव 9970145051
शुभेच्छूक
प्रा.समधानी सर शेळगांवकर


मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर...
शुभेच्छा...
माया नायगांव 9970145051
सौ.मनिषा नागेश्वर
माजी जि.प.सदस्या तथा
जिल्हा महिला अध्यक्ष, बुरुड समाज संघटना, नांदेड
श्री पांडूरंग नागेश्वर
सचिव, जि.प. कर्मचारी पतसंस्था नांदेड


मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा...
शुभेच्छूक
अविनाश नागेश्वर


मा.श्री.श्रावण पाटील भिलवंडे
(माजी सभापती, पंचायत समिती,नायगांव)
(चेअरमन,श्री तुळजा भवानी जिनींग संस्था,नरसी )
यांना वाढदिवसाच्या आभाळभर शुभेच्छा...
शुभेच्छूक
सय्यद खलीलसेठ मैनोदिन
युवा नेतृत्व अल्पसंख्याक आघाडी, भाजपा

# चंदेरी

## अभिनेत्री काजल अग्रवालची विशेष मुलाखत

# अन्नातील भेसळ आई म्हणून मला घाबरवते...

**दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री काजल अग्रवाल आता चार वर्षांच्या नीलची आई आहे. लवकरच ती अन्नातील भेसळीसारख्या गंभीर विषयावर आधारित 'द इंडिया स्टोरी' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आपल्या कारकिर्दीतील संघर्ष, मातृत्व, काम, जीवन समतोल आणि आगामी चित्रपटांबद्दल तिने मनमोकळ्या गप्पा मारल्या.**



### एकेकाळी माझं स्वत:चं आयुष्यच नव्हतं...

यशस्वी कारकिर्दीबद्दल बोलताना काजल म्हणाली, की "देवाची कृपा आणि ज्येष्ठांचे आशीर्वाद यामुळे मला उत्तम कलाकारांसोबत काम करण्याची संधी मिळाली. अभिनयावर माझं मनापासून प्रेम आहे. आजवर मिळालेल्या भूमिका आणि प्रेक्षकांचे प्रेम यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजते." ती पुढे म्हणाली, की "मात्र हा प्रवास अजिबात सोपा नव्हता. त्या काळात मी वर्षाला सात ते आठ चित्रपट करत होते. मुंबईत दिवाळी किंवा वाढदिवस अशा मोजक्या दिवशीच यायचे. उरलेले जवळपास वर्षभर शूटिंग आणि प्रवासातच जायचे. माझं स्वतःचं आयुष्यच नव्हतं. मित्रमैत्रिणी आयुष्याचा आनंद घेत होते आणि मी फक्त काम करत होते. आयुष्य जगण्याचा आनंद काय असतो, हेच मला तेव्हा माहीत नव्हतं."

### वर्क-लाईफ बॅलन्स हीच आजची सर्वात मोठी परीक्षा

चार वर्षांच्या नीलची आई झाल्यानंतर आयुष्यातील प्राधान्यक्रम बदलल्याचे काजल सांगते. ती म्हणते, की "आता माझ्यासाठी सर्वात मोठं आव्हान म्हणजे वेळेचं व्यवस्थापन. काम आणि कुटुंब या दोन्ही जबाबदाऱ्या योग्य प्रकारे पार पाडायच्या आहेत. आई म्हणून अपराधी वाटू नये आणि कामाबद्दलही अपराधी वाटू नये, यासाठी सातत्याने समतोल साधावा लागतो." "माझा मुलगा रोज म्हणतो, 'मम्मा, शूटिंगला जाऊ नकोस.' ते ऐकलं की आई म्हणून मनाला खूप वाईट वाटतं. पण या भावनांसोबत जगायला शिकावं लागतं. स्वतःलाही आणि मुलांनाही भावनिकदृष्ट्या सक्षम बनवावं लागतं. प्रत्येक टप्प्याची स्वतःची आव्हानं असतात आणि तीच जीवनप्रवास अधिक सुंदर बनवतात." नीलला आता आई चित्रपट अभिनेत्री असल्याची जाणीव होऊ लागली आहे. मात्र, त्याला आईसोबत इतरांनी फोटो काढणं अजिबात आवडत नाही. "एअरपोर्टवर कोणी माझ्यासोबत फोटो काढायला आलं की तो लगेच माझ्याजवळ येऊन बिलगतो आणि म्हणतो, 'माझ्या मम्मीसोबत फोटो काढायचा नाही.' त्या वेळी मला खूप गमतीशीर पण कठीण प्रसंगाला सामोरं जावं लागतं."

### मुलगा स्वत:ला रावण म्हणतो, मला मंदोदरी...

नितेश तिवारी यांच्या महत्त्वाकांक्षी 'रामायणम्' चित्रपटात काजल मंदोदरीची भूमिका साकारत आहे. या अनुभवाबद्दल ती म्हणाली, की "हा अनुभव अत्यंत वेगळा आणि अविस्मरणीय आहे. शूटिंग करताना या चित्रपटाची भव्यता स्पष्ट जाणवते. हा जागतिक दर्जाचा चित्रपट ठरेल, याची खात्री वाटते. भारतीय कलाकार आणि तंत्रज्ञ इतक्या मोठ्या प्रमाणावर असे काम करत आहेत, याचा अभिमान वाटतो." मुलगा नीलसोबतचा एक मजेशीर किस्सा सांगताना ती हसत म्हणाली, "नीलला रामायणाची कथा खूप आवडते. त्याला मंदोदरी कोण आहे, हे माहीत आहे. मी त्याला सांगितलं की मी चित्रपटात मंदोदरीची भूमिका करत आहे. त्यानंतर तो खेळताना स्वतःला रावण म्हणतो आणि मला 'तू मंदोदरी' असं म्हणत खेळायला बोलावतो."

### 'द इंडिया स्टोरी' प्रेक्षकांचे डोळे उघडणारा

'द इंडिया स्टोरी' या चित्रपटात अन्न, दूध, फळे यांमधील भेसळीचा गंभीर विषय मांडण्यात आला आहे. या विषयाशी स्वतःचा भावनिक संबंध असल्याचे काजल सांगते. "आई म्हणून या गोष्टींची खूप भीती वाटते. आपल्या मुलासाठी कोणता अन्नपदार्थ सुरक्षित आहे आणि कोणता नाही, हे अनेकदा समजत नाही. फळं, दूध किंवा इतर अन्नपदार्थ मोठ्या दुकानातून घेतले तरी ते पूर्णपणे सुरक्षित असतीलच, याची खात्री देता येत नाही. त्यामुळे अधिक जागरूक राहणं गरजेचं आहे." ती पुढे म्हणाली, "या चित्रपटासाठी दिग्दर्शक डी. के. चेतन यांनी केलेल्या संशोधनामुळे अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. हा चित्रपट प्रेक्षकांचे डोळे उघडणारा ठरेल."

### आता चित्रपट निवडताना अधिक विचार करते...

चित्रपटांच्या निवडीबाबतही तिचा दृष्टिकोन बदलल्याचे काजलने सांगितले. "काळानुसार माणसाची विचारसरणी आणि निवड बदलत जाते. कारकिर्दीच्या सुरुवातीला स्वतःला सिद्ध करण्यासाठी मिळणारा जवळपास प्रत्येक चित्रपट स्वीकारत होते. वर्षाला आठ चित्रपटही केले आहेत. आता मात्र स्क्रिप्ट वाचल्यानंतर लगेच जाणवतं की हा चित्रपट करायचा की नाही." मातृत्वामुळे या निर्णयांवर परिणाम झाला का, असे विचारल्यावर ती म्हणाली, की "मी कोणती ठरावीक यादी पाळत नाही. पण आता प्रत्येक कथा वाचताना मुलाचा विचार नकळत मनात येतो. त्यामुळे माझ्यात एक नैसर्गिक फिल्टर तयार झाला आहे."

## अभिनेता कुणाल खेमूची विशेष मुलाखत

# दुसऱ्यांच्या सल्ल्यानुसार आयुष्य जगू नका; सोशल मीडियावरून नात्यांचे मूल्यमापन नको

**बालकलाकार म्हणून अभिनय क्षेत्रात पदार्पण केलेल्या कुणाल खेमूने अभिनेता, दिग्दर्शक, लेखक आणि गायक अशा विविध भूमिका यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. सध्या तो ओटीटीवरील 'अलायन्स' या रिॲलिटी शोचे सूत्रसंचालन करत असल्यामुळे चर्चेत आहे. या निमित्ताने त्याने वैवाहिक नाते, पालकत्व, दिग्दर्शन, चित्रपट निर्मिती आणि बॉक्स ऑफिसवरील चित्रपटांच्या यश-अपयशाबाबत मनमोकळ्या गप्पा मारल्या...**



### आयुष्य स्वत:च्या पद्धतीने जगा

कपिल शर्मा आणि अमिताभ बच्चन यांच्या सूत्रसंचालनाचे कौतुक करताना कुणाल म्हणाला, की "आपल्याकडे कपिल शर्माने अनेक वर्षे उत्कृष्ट सूत्रसंचालन केले आहे. अनेकजण त्याच्यासाठीच कार्यक्रम पाहतात. अमिताभ बच्चन यांनी 'कौन बनेगा करोडपती' अत्यंत सन्मानपूर्वक आणि प्रभावी शैलीत सादर केला आहे. मला असा एकही सूत्रसंचालक आठवत नाही, ज्याच्याबद्दल वाईट म्हणावं लागेल. प्रत्येकाची स्वतःची शैली आहे आणि प्रत्येकजण चांगलं काम करत आहे."

### मी अजूनही चांगला बाबा होण्याचा प्रयत्न करतोय...

आठ वर्षांच्या इनायाचा पिता असलेल्या कुणालला 'आदर्श वडील' म्हटल्यावर तो नम्रपणे म्हणतो, की "लोक मला चांगला बाबा म्हणतात तेव्हा थोडं संकोच वाटतो. मी आणि सोहाने पालकत्वासाठी कधी कोणाचा सल्ला घेतला नाही किंवा कोणतं पुस्तकही वाचलं नाही. आम्हाला जे योग्य वाटतं, तेच करण्याचा प्रयत्न करतो." तो पुढे म्हणाला, की "चांगला पालक होण्यासाठी कोणताही ठरावीक फॉर्म्युला नसतो. मी रोज सकाळी उठल्यावर एकच विचार करतो की, आज माझ्या मुलीसाठी कालपेक्षा अधिक चांगला बाबा कसा होऊ शकतो? लोक मला चांगला पिता म्हणतात, ही माझ्यासाठी मोठी गोष्ट आहे. पण मी अजूनही त्या दिशेने शिकत आणि प्रयत्न करत आहे."



### सोशल मीडियावरून नात्यांचा अंदाज बांधू नका...

पत्नी सोहा अली खानसोबतच्या ११ वर्षांहून अधिक वैवाहिक आयुष्याबद्दल विचारले असता कुणाल म्हणाला, की "वैवाहिक आयुष्यासाठी कोणताही ठरलेला फॉर्म्युला किंवा टिप्स नसतात. माझा सर्वात मोठा सल्ला म्हणजे दुसऱ्यांच्या सल्ल्यानुसार आपलं आयुष्य जगू नका. स्वतःच्या पद्धतीने जगा. आयुष्यात गोड-तिखट प्रसंग येणारच." तो पुढे म्हणाला, की "सोशल मीडियावर दिसतं तेच संपूर्ण सत्य असतं, असा समज करून घेऊ नका. तिथे कोणीही आपल्या अडचणी दाखवत नाही. प्रत्येक नात्यात चढ- उतार असतात. पण जर नातं मनापासून जुळलेलं असेल, तर ते सहजासहजी तुटू देऊ नये. आमच्यातील नातं एका दिवसात तयार झालेलं नाही. एकमेकांना समजून घेण्यासाठी, जुळवून घेण्यासाठी आणि एकत्र वाढण्यासाठी अनेक वर्षे लागली. आजकाल लोक नात्यांना पुरेसा वेळ देत नाहीत. संयम ठेवा, एकमेकांना समजून घेण्याची संधी द्या, तेव्हाच नात्याचं खरं सौंदर्य अनुभवता येईल."

### अभिनय माझं पहिलं प्रेम; दिग्दर्शनात अधिक स्वातंत्र्य...

अभिनय, दिग्दर्शन, लेखन, गायन आणि सूत्रसंचालन यापैकी कोणत्या भूमिकेचा सर्वाधिक आनंद मिळतो, या प्रश्नावर कुणाल म्हणाला, की "मी कधीही केवळ गरज म्हणून कोणतंही काम केलं नाही. जे आवडतं तेच करतो. अभिनय हे माझं पहिलं प्रेम आहे. मात्र दिग्दर्शन आणि लेखनामुळे मला वेगळं स्वातंत्र्य मिळालं." तो पुढे म्हणाला, की "अभिनेता म्हणून तुमच्या हातात फक्त तुमचा अभिनय आणि भूमिका असते. कोणता प्रसंग चित्रपटात राहणार, संपादनात काय बदल होणार, हे दिग्दर्शक ठरवतो. पण दिग्दर्शन करताना संपूर्ण सर्जनशील नियंत्रण तुमच्याकडे असतं. त्यामुळे तो अनुभव माझ्यासाठी खूप खास होता. सूत्रसंचालनही मी स्वीकारलं कारण ते माझ्यासाठी पूर्णपणे नवीन क्षेत्र होतं."

### चित्रपट निर्मितीची प्रक्रिया उलटी झाली आहे...

दिग्दर्शक म्हणून 'मडगाव एक्सप्रेस' या चित्रपटाच्या यशानंतर सध्याच्या बॉक्स ऑफिसबद्दल बोलताना कुणाल म्हणाला, की "गेल्या काही वर्षांत चित्रपट निर्मितीची प्रक्रिया काहीशी उलटी झाली आहे. आधी एक दमदार कथा असावी, ती प्रामाणिकपणे मांडणारा दिग्दर्शक असावा आणि त्यानंतर कलाकारांची निवड व्हावी. पण अनेकदा आधी स्टार ठरतो, मग बजेट ठरतं आणि शेवटी कथा शोधली जाते. तिथूनच समस्या सुरू होते." आजच्या बदलत्या मनोरंजनविश्वाबद्दल तो म्हणाला, की "आज प्रेक्षकांकडे मनोरंजनासाठी अनेक पर्याय उपलब्ध आहेत. चित्रपटाला आता केवळ दुसऱ्या चित्रपटांशीच नव्हे, तर ओटीटी, वेब सिरीज आणि इतर माध्यमांशीही स्पर्धा करावी लागते. त्यामुळे सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दमदार कथा. कथा चांगली असेल, तर मोठं बजेट किंवा प्रचंड मार्केटिंग नसतानाही चित्रपट यशस्वी होऊ शकतो. अनेक भारतीय तसेच हॉलीवूडमधील चित्रपटांनी हे सिद्ध केलं आहे."

### मी रिॲलिटी शोचा स्पर्धक होऊ शकत नाही...

स्वतः रिॲलिटी शोचे सूत्रसंचालन करत असला तरी स्पर्धक म्हणून सहभागी होण्यास कुणालने स्पष्ट नकार दिला. "नाही... अजिबात नाही. जे लोक रिॲलिटी शोमध्ये स्पर्धक म्हणून सहभागी होतात ते खूप धाडसी असतात. चोवीस तास कॅमेऱ्यांसमोर राहणं, सतत नियम पाळणं आणि बाहेर आल्यानंतर लोकांनी तुमच्याबद्दल तयार केलेल्या मतांना सामोरं जाणं, हे माझ्यासाठी शक्य नाही." तो पुढे म्हणाला, की "माझा स्वभाव तसा नाही. माझं मन एकाच वेळी अनेक गोष्टींमध्ये गुंतलेलं असतं. त्यामुळे मी रिॲलिटी शोमध्ये चांगला स्पर्धक ठरणार नाही, असंच मला वाटतं."

## चित्रपट निर्माते राजकुमार हिरानी यांची विशेष मुलाखत

# विनोदाच्या नावाखाली खिल्ली उडवणं चूक

**हिंदी चित्रपटसृष्टीतील आघाडीचे दिग्दर्शक आणि निर्माते राजकुमार हिरानी सध्या त्यांच्या बॅनरखाली तयार झालेल्या 'प्रीतम अँड पेड्रो' या वेब सिरीजमुळे चर्चेत आहेत. या सिरीजमधून त्यांचा मुलगा वीर हिरानी अभिनय क्षेत्रात पदार्पण करत आहे. मात्र, सुरुवातीला आपण मुलाला अभिनेता होऊ नकोस, असा सल्ला दिला होता, असा खुलासा हिरानी यांनी एका विशेष मुलाखतीत केला.**

वीरच्या अभिनय क्षेत्रातील प्रवासाबद्दल बोलताना राजकुमार हिरानी म्हणाले, की "वीरला अभिनय करायचा आहे, हे मला समजल्यावर मी त्याला स्पष्टपणे 'हे करू नकोस' असंच सांगितलं होतं. कारण तो लहानपणापासून शॉर्ट फिल्म्स बनवत होता. मला वाटत होतं की तो उत्तम चित्रपट निर्माता होऊ शकतो. मग अभिनयाचाच हट्ट का, असा माझा प्रश्न होता." मात्र, वीरने त्यांनाच त्यांच्या '३ इडियट्स' चित्रपटातील संवादाची आठवण करून दिली. "तो म्हणाला, की 'तुम्हीच तर ३ इडियट्समध्ये सांगितलं होतं की मनाचं ऐका.' ते ऐकून मीच निरुत्तर झालो. मग मी त्याला सांगितलं की अभिनय करायचाच असेल तर आधी त्याचं योग्य प्रशिक्षण घे."



### तीन वर्षे अभिनयाचे शिक्षण घेतल्यानंतरच संधी दिली...

राजकुमार हिरानी यांनी सांगितले की, वीरने त्यांच्या सल्ल्यानुसार तीन वर्षे ड्रामा स्कूलमध्ये अभिनयाचे शिक्षण घेतले. त्यानंतर फिरोज खान यांच्यासोबत रंगभूमीवर काम केले आणि मगच 'प्रीतम अँड पेड्रो'मध्ये भूमिका साकारली. ते म्हणाले, की "आम्ही या वेब सिरीजची तयारी करत होतो, पण वीरचा विचार आमच्या डोक्यात नव्हता. कास्टिंग सुरू असताना त्याने आमच्या ऑफिसमधील सहकाऱ्यांना गंमतीने सांगितलं, 'मी इथेच बसलो आहे आणि माझ्याकडे कोणाचंच लक्ष नाही.'" ते पुढे म्हणाले, की "मला वाटत होतं की तो चित्रपटातून पदार्पण करेल. त्यासाठी काही चर्चा सुरू होत्या आणि मीही त्याच्यासाठी योग्य कथा शोधत होतो. पण त्याने वेब सिरीज करण्याची तयारी दाखवली. मग मी त्याला ऑडिशन द्यायला सांगितलं. ऑडिशन चांगलं झालं आणि त्यानंतर त्याची निवड झाली. आजच्या काळात सुरुवात चित्रपटातूनच व्हायला हवी, असा आग्रह राहिलेला नाही. सातत्याने चांगलं काम करत राहणं आणि शिकत राहणं अधिक महत्त्वाचं आहे."

### प्रेक्षकांच्या सवयी बदलल्या...



ओटीटीच्या वाढत्या प्रभावामुळे चित्रपटगृहांवर परिणाम झाला का, या प्रश्नावर राजकुमार हिरानी म्हणाले, की "चित्रपटगृह आणि ओटीटी हे दोन्ही माध्यमं आजही एकत्र चालत आहेत. आज चित्रपटांचा व्यवसाय पूर्वीपेक्षा मोठा होत आहे. मात्र, कोविडनंतर प्रेक्षकांच्या सवयी बदलल्या आहेत. लोकांनी घरबसल्या दर्जेदार आशय पाहण्याची सवय लावून घेतली." ते पुढे म्हणाले, की "आता प्रेक्षक अधिक निवडक झाले आहेत. ते चित्रपटगृहात जाण्यापूर्वी त्या चित्रपटाबद्दलची प्रतिक्रिया ऐकतात. पूर्वी छोट्या चित्रपटांनाही काही प्रमाणात व्यवसाय मिळत असे, पण आता तसं होत नाही. मात्र, ज्या चित्रपटाची कथा प्रभावी असते आणि ज्याबद्दल सकारात्मक प्रतिसाद मिळतो, तो चित्रपट प्रेक्षक आवर्जून पाहतात. अलीकडील काही चित्रपटांनी विक्रमी व्यवसाय करून हे पुन्हा सिद्ध केले आहे."

### विनोद करतानाही मर्यादा पाळायला हव्यात...

हिरानी यांच्या चित्रपटांमध्ये विनोदाला विशेष स्थान असते. 'प्रीतम अँड पेड्रो' या सायबर गुन्ह्यांवर आधारित वेब सिरीजमध्येही विनोदाचा वापर करण्यात आला आहे. सध्याच्या काळात विनोदावरून निर्माण होणाऱ्या वादांबाबत ते म्हणाले, की "विनोदाचे अनेक प्रकार असतात. दुसऱ्याच्या दुर्दैवावर हसणं हाही एक प्रकार आहे. पण त्यालाही मर्यादा असायला हव्यात. जर एखाद्याच्या भावना गंभीरपणे दुखावल्या जाणार असतील, तर असा विनोद करण्याचं कारणच काय?" ते पुढे म्हणाले, की "स्वतःच्या फायद्यासाठी दुसऱ्याची खिल्ली उडवणं योग्य नाही. कोणाच्याही भावना न दुखावता देखील उत्कृष्ट विनोद करता येतो, यावर माझा विश्वास आहे."

### मुलाला अभिनयाची आवड असेल तर त्याला का रोखायचं?

चित्रपटसृष्टीतील घराणेशाहीच्या चर्चेबाबत विचारले असता हिरानी म्हणाले, की "हा विचार मनात येतोच. पण एखाद्या मुलाला अभिनयाची खरी आवड असेल, तर त्याला का रोखायचं? मी स्वतः नागपूरमधील एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो आहे. माझे वडील कार्यालयीन उपकरणांचा व्यवसाय करत होते. मला मात्र चित्रपटसृष्टीत यायचं होतं. त्यांनी मला माझ्या मनाप्रमाणे निर्णय घेऊ दिला. त्याचप्रमाणे मीही वीरला त्याच्या आवडीचा मार्ग निवडू दिला."




**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com